# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०७/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## पो.स्टे. उमरेड हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २१/०७/२०२४ रोजी पोस्टे उमरेड येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन उमरेड हद्दीतील उमरेड न्यायालयाच्या बाजूला असलेल्या जुन्या ढोर दवाखान्याच्या खुल्या जागेत काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून सदर पथकाने उमरेड न्यायालयाच्या बाजूला असलेल्या जुन्या ढोर दवाखान्याच्या खुल्या जागेत सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) केतन प्रभाकर सोनटक्के, वय २६ वर्ष, रा. देवतळे ले आउट उमरेड २) वैभव रूपेश पराते वय २३ वर्ष रा. ईतवारी पेठ उमरेड ३) सुनील कृष्णाजी बोरीकर, वय ४५ वर्ष रा. जोगीठाणा पेठ उमरेड ४) प्रविण महादेव दवंडे वय ३५ वर्ष रा. जोगीठाणा पेठ उमरेड ५) आाकाश हरीजी मांढरे वय ३२ वर्ष रा. जोगीठाणा पेठ उमरेड ६) अमोल गुलाबराव गजभिये वय ३३ वर्ष रा. जोगीठाणा पेठ उमरेड ७) विशाल हरीमण कांडरकर वय ३८ वर्ष रा. जोगीठाणा पेठ उमरेड ८) आशिष मनोहर अग्रीहोत्री वय ३७ वर्ष रा. बुधवारी पेठ उमरेड** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन आरोपी क्र. ०१ ते ०८ यांच्या कडुन नगदी ६,७७०/— रू. , डावावरचे नगदी ३,७१०/— रू. बावन्न ताश पत्ते किंमती २० रू. एकूण १०,५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे उमरेड कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि प्रमोद घोंगे, पोहवा राधेश्याम कांबळे, प्रदीप चवरे, पोना पंकज बट्टे, श्रीचंद पवार, पोशि रोशन शहारे, नंदु शेंडे, उमेश मोहुर्ले, प्रविण बारई यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर